# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -१८

## वैद्यकिय मुख्य कार्यालय

## सभावृत्तांत

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ नुसार समितीचे सदस्यांशी विविध विषयांवर चर्चा करणेकामी आढावा बैठक दि. १४/०६/२०१९ रोजी दु. १.३० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीकरिता खालील अधिकारी उपस्थित होते.

१. श्री.संतोष पाटील, अतिरिक्त आयुक्त तथा उपाध्यक्ष
२. श्री.बबनराव झिंझुर्डे अध्यक्ष, पि. चि. मनपा कर्मचारी महासंघ
३. डॉ.पवन साळवे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी तथा कार्याध्यक्ष
४. श्री.मनोज लोणकर, सहाय्यक आयुक्त, प्रशासन
५. श्री.आमोद कुंभोजकर, मुख्य लेखा परिक्षक, तथा सदस्य
६. श्री.जितेंद्र कोळंबे, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री.मनोज देशमुख, वैद्यकिय अधिक्षक
८. श्री.प्रमोद जगताप, कामगार कल्याण अधिकारी

सदर बैठकीमध्ये विषय पत्रिकेत नमूद करण्यात आलेल्या मुद्यांचे अनुषंगाने चर्चा करण्यात आलेली असून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१) धन्वंतरी स्वास्थ्य योजनेअंतर्गत वैद्यकिय उपचारांचा बिलांचा तपशील मा.मुख्यलेख्यापाल व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचेकडून तपासून घेऊन सदर खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी धन्वंतरी स्वास्थ्य योजनेअंतर्गत झालेल्या खर्चाचा तपशील दिला असता त्यामध्ये र.रु.५,९२,७६,०५०/- कोटी इतकी तरतुद शिल्लक असून रुग्णालयांना दयावयाची प्रलंबित बिलांची रक्कम दि.१० जुलै २०१९ पर्यंत अंदाजे र.रु.११ कोटीची असल्याची शक्यता आहे. प्रलंबित बिलांसाठी लागणा-या खर्चाकरिता नियमानुसार वर्गीकरण करुन तरतुद उपलब्धतेबाबत विभागाने कार्यवाही करावी.

२) धन्वंतरी योजनेअंतर्गत पॅनेलवरील हॉस्पिटलांनी अल्कोहोलीक रेफरचिट दिल्यामुळे सदर पॅनेलवरील अल्कोहोल प्राशन केल्यामुळे झालेले आजार, इजा, अपघात यांमुळे झालेली इजा हॉस्पिटलशी संबंधीत कर्मचा-याचे उपचार करुन तशी बिले हॉस्पिटलने वैद्यकिय विभागास सादर केलेली आहेत. रुग्ण दाखल होताना सदरच्या रेफरचिट पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयीन वेळेनंतर करार पध्दतीने नेमलेल्या वैद्यकीय अधिका-यांनी दिलेली असल्याने रेफर घेणा-या रुग्णाकडून बिल वसूल करणेत यावे.

१. श्री.चंद्रकांत शेलार यांनी भोसरी रुग्णालयातून रेफरचीट घेऊन संत ज्ञानेश्वर रुग्णलायात दाखल होऊन उपचार घेतले आहेत. पेशंट स्वत: कर्मचारी असून त्यांचा आजार हा परिशिष्ट "ड" मधील अनुज्ञेय नसलेल्या यादीतील अ.क्र.५ मधील असल्यामुळे सदरचे बिल नामंजुर करणेत मान्यता देणेत आलेली आहे.

२. श्री.सोमा गव्हाणे यांचा ऍक्सीडेंट झाला होता त्यानंतर वायसीएम रुग्णालयाने रेफरचीट दिली असून मॅक्स न्युरो हॉस्पिटलने पेशंटवर उपचार करुन पेशंट मदयाच्या अंमलाखाली होता असे नमूद केले आहे. सदरचे बिल हे परिशिष्ट "ड" मधील अनुज्ञेय नसलेल्या यादीतील अ.क्र. ५ मधील असल्यामुळे सदरचे बिल नामंजुर करणेत मान्यता देणेत आलेली आहे.

३. श्रीम.लता सुरेश कांबळे यांना ब्रेस्ट कॅन्सर असल्याने त्यांनी गॅलेक्सी केअर हॉस्पिटल येथे रेफर न घेता सर्जरी करुन उपचार घेतले आहे. तरी सदरचा उपचार घेतलेला रुग्ण दगावला असल्याने तरी त्यांचे वैद्यकिय उपचाराचे बील धन्वंतरी धोरणाप्रमाणे मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

४. श्री.सागर अशोक रानवडे, यांची आई श्रीम.वासंती रानवडे यांचे कॅन्सरवरील उपचार चालू असून रेफरचीट चालू होण्यापूर्वीच गॅलेक्सी केअर हॉस्पिटल येथे उपचार घेत होते. त्यांनी रेफरचीट न घेता केमोथेरपी केल्याने रुग्णालयास मेलद्वारे पुर्तता करणेस सांगितले असता रुग्णालयाने पेशंट बेडरिटन असल्याने ईमरजन्सीमध्ये त्यांची केमोथेरपी केल्याचे पत्र दिले. सदरचा रुग्ण दगावला असल्याने त्यांचे वैद्यकिय उपचाराचे बील धन्वंतरी धोरणाप्रमाणे मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

५. श्री.अनिल वसंत थेऊरकर यांनी वायसीएम रुग्णालयाने रेफरचीट दिली. त्यानुसार त्यांनी आदित्य बिर्ला हॉस्पिटलने पेशंटवर उपचार केले आहे. तरी रुग्णालयांनी आयपीडी पेपर तपासले असता सदरचे उपचार हे परिशिष्ट "ड" मधील आजारातील असल्याने सदरचे बिल नामंजुर करणेत मान्यता देणेत आलेली आहे.

६. श्री.निलेश राजु कांबळे हे साबळे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे Acute Appendicitis या आजारासाठी दाखल होऊन उपचार घेतले आहेत. सदरचे हॉस्पिटल हे A श्रेणीत असल्याने सदरचे बिल नामंजुर केले होते. तरी रुग्णालयाने दि.१३/०३/२०१९ रोजीच्या अर्जात सदर रुग्ण हा तीव्र पोटदुखीसाठी रुग्णालयात रेफरचीट घेऊन दाखल झाला होता. त्यांच्या तपासण्या केल्यानंतर त्यांचे ऑपरेशन बाहेरुन सर्जन बोलावून तातडीमध्ये केलेबाबत पत्रात नमूद केले आहे. त्यांच्या उपचाराची तातडी विचारात घेऊन वैद्यकिय उपचाराचे बील धन्वंतरी धोरणाप्रमाणे मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

३) धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये महिला कर्मचारी यांचे आई-वडीलांची नावे कमी करुन सासु / सासरे यांची नावे समाविष्ट करणेबाबत तसेच सासु/सासरे यांची नावे कमी करुन आई/वडीलांची नावे समाविष्ट

करणेबाबत अर्ज सादर केलेले आहेत. त्यांच्यासाठी संबंधित कर्मचा-यांना लग्न झालेनंतर फक्त एकदाच नावे बदलता येतील.

४) शिक्षण विभागाचे शिक्षक कर्मचारी व सेवानिवृत्त शिक्षक कर्मचारी यांना धन्वंतरी स्वास्थ्य योजनेत सहभागी करुन घेणेसाठी शिक्षकांचा हिस्सा ६०० व मनपा हिस्सा ३०० तसेच सेवानिवृत्त शिक्षकांसाठी ३०० कपात करणेबाबत दि.२९/०९/२०१५ रोजीचे धन्वंतरी समितीने मान्यता दिली होती. त्यानुसार दि. २५/१०/२०१८ रोजी धन्वंतरी समितीने शिक्षण मंडळाला धन्वंतरी लागू करणेकामी मान्यता देऊन दि.०५/१२/२०१८ रोजीचे कपात करणेबाबत आदेश काढणेत आला त्यानंतर शिक्षक संघटनाचे पत्राचे अनुशंगाने सदरची कपात मार्च २०१९ अखेरपर्यत स्थगित ठेवणेबाबत शिक्षण मंडळाकडून आदेश काढणेत आला होता. त्याबद्दल मा.आयुक्त सो. यांचेशी चर्चा करावी लागेल असे सांगण्यात आले.

५) वैद्यकीय बिलांची प्रतिपुर्ती करुन मिळणेबाबत अर्ज आलेले आहेत. सदर बिलांच्या प्रतीपुर्तीबाबत धन्वंतरी स्वास्थ्य समितीमध्ये चर्चा होऊन मा.अति.आयुक्त सो. यांनी बिलातील वैद्यकीय तातडीबाबत संबधित वैद्यकीय अधिकारी व अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी मंजुरीबाबत निर्णय घेऊन प्रतिपुर्तीबाबतचे आदेश निर्गत करावेत.

६) पिपंरी चिंचवड महानगरपालिकेतील आस्थापनेवरील व धन्वंतरी स्वास्थ्य योजना समितीचे सदस्य श्री.मधुकर रणपिसे, कार्याध्यक्ष, पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ व श्रीम.रेखा गाडेकर, प्रशासन अधिकारी (महिला) हे दोन सदस्य नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेमुळे त्यांचे जागी श्री.शिवाजी येळवंडे व श्रीम.सिमा सुकाळे यांची नियुक्ती करणेत आली आहे.

| | | |
|---|---|---|
| प्रमोद जगताप<br>कामगार कल्याण अधिकारी<br>तथा सदस्य | आमोद कुंभोजकर<br>मुख्य लेखापरिक्षक<br>तथा सदस्य | जितेंद्र कोळंबे<br>मुख्य लेखा अधिकारी<br>तथा सदस्य |
| मनोज देशमुख<br>वैद्यकीय अधिक्षक<br>तथा सदस्य | मनोज लोणकर<br>सहाय्यक आयुक्त (प्रशासन)<br>तथा सदस्य | बबनराव झिंजुर्डे<br>अध्यक्ष, कर्मचारी महासंघ<br>तथा उपाध्यक्ष |
| संतोष पाटील<br>अति.आयुक्त | | डॉ. पवन साळवे<br>अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी |

श्रावण हर्डीकर
आयुक्त
तथा अध्यक्ष